मंत्रालयीन विभागातील सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव यांना ठोक भरपाई मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः भाप्रसे-१०१३/प्र.क्र.३१ /२०१३/का-९,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **२८.०८.२०१९**

वाचा:-

१) शासन निर्णय , वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-१००५/प्र.क्र.१६/२००५/विनियम, दिनांक १४.०७.२००५,
२) शासन निर्णय , वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-१००५/प्र.क्र.३९/२००५/विनियम, दिनांक २३.०१.२००६,
३) शासन निर्णय , वित्त विभाग, क्रमांक-चवक-१४१०/प्र.क्र.११/सेवा-३, दिनांक १२.०८.२०१०,
४) महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६,
५) समक्रमांकित दिनांक ०८.०५.२०१३ चा शासन निर्णय,
६) समक्रमांकित दिनांक १८.०५.२०१३ चा शासन निर्णय.

प्रस्तावना:-

राज्यातील अधिकालिक अथवा त्यावरील श्रेणीतील भारतीय प्रशासन अधिका-यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती घेण्याच्या वारंवारितेचे विश्लेषण केले असता, इतर कारणांसोबतच प्रधान सचिव व त्यावरील श्रेणीमध्ये पदोन्नतीनंतर आर्थिकदृष्ट्या भरीव लाभ मिळत नसणे व मुंबई महानगर क्षेत्रातील व विशेषत: मंत्रालयातील पदस्थापनेच्या कालावधीत त्यांना अधिक भरपाईची आवश्यकता असणे अशीही कारणे निदर्शनास आली. या पार्श्वभूमीवर मंत्रालयात सचिव व त्यावरील श्रेणीमध्ये काम करणा-या अधिका-यांना (सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव) सहाव्या वेतन आयोगाच्या श्रेणी वेतनाच्या आधारे ठोक भरपाई मंजूर करण्याबाबतचा संदर्भाधीन क्रमांक-५ येथे नमूद शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या शासन निर्णय क्रमांक-भाप्रसे-१११६/प्र.क्र.१७५/२०१६/९-अ, दिनांक ०१.१०.२०१६ अन्वये महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांना दिनांक ०१.०१.२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. त्यानुसार मंत्रालयात सचिव व त्यावरील श्रेणीमध्ये काम करणा-या अधिका-यांना मंजूर करण्यात येणा-या ठोक भरपाई रक्कमेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

मंत्रालयातील सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव तसेच मुख्य सचिव यांना संदर्भाधीन क्रमांक-५ येथे नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणा-या ठोक भरपाई रक्कमेमध्ये या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात येत असून त्यानुसार खालील प्रमाणे एकत्रित ठोक भरपाई मंजूर करण्यात यावी:-

(I) मंत्रालयात सचिव पदावर काम करणा-या अधिका-यांना सातव्या वेतन आयोगानुसार सचिव पदाच्या Pay Matrix Level-१४ मधील Cell-१ च्या १५% एवढी एकत्रित ठोक भरपाई रक्कम दरमहा देण्यात यावी.

(II) मंत्रालयात प्रधान सचिव पदावर काम करणा-या अधिका-यांना वरील (I) प्रमाणे येणा-या रकमेच्या दीडपट एवढी एकत्रित ठोक भरपाई रक्कम दरमहा देण्यात यावी.

(III) मंत्रालयात अपर मुख्य सचिव पदावर काम करणा-या अधिका-यांना वरील (II) प्रमाणे येणा-या रकमेच्या दीडपट एवढी एकत्रित ठोक भरपाई रक्कम दरमहा देण्यात यावी.

(IV) मंत्रालयात मुख्य सचिव पदावर काम करणा-या अधिका-यांस वरील (III) प्रमाणे येणा-या रकमेच्या दीडपट एवढी एकत्रित ठोक भरपाई रक्कम दरमहा देण्यात यावी.

२. या शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या ठोक भरपाईचा लाभ सर्व मंत्रालयीन विभागाचे सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव यांना लागू राहील. हा लाभ गृह विभागातील सचिव पदावर कार्यरत भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी तसेच, सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागांतर्गत सचिव /प्रधान सचिव पदावर कार्यरत अधिका-यांना देखील लागू राहील. तसेच, या ठोक भरपाईचा लाभ मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांच्याकडे नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव यांना देखील त्या पदावरील नियुक्तीच्या कालावधीत लागू राहील.

३. या ठोक भरपाईचा लाभ फक्त मंत्रालयीन विभागात कार्यरत असलेल्या सर्व सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव यांना अनुज्ञेय राहील. मंत्रालयातील उपरोक्त पदावर कार्यरत अधिकारी हे त्यांच्या बदलीनंतर मुंबई किंवा राज्यातील अन्य ठिकाणच्या पदावर गेल्यानंतर त्यांना वित्त विभागाच्या स्थायी आदेशानुसार लागू असलेली भरपाई अनुज्ञेय राहील. त्यांना या शासन निर्णयानुसार विहीत केलेली भरपाई देय असणार नाही.

४. या आदेशाच्या परिणामी मंत्रालयात कार्यरत असलेल्या सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव यांना ते त्या पदावर कार्यरत असलेल्या कालावधीत सध्या दरमहा मिळणारा शहर पुरक भत्ता रु.३००/- ते त्या पदावर कार्यरत असेपर्यंत अनुज्ञेय राहणार नाही.

५. उपरोक्त संदर्भ क्रमांक-४ येथील नमूद महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील तरतूदीनुसार मा.मंत्री, मा.राज्यमंत्री महोदयांच्या निवासस्थानी फर्निचर, वीज व पाणी या सुविधा विनामुल्य स्वरुपात पुरविण्यात येतात. त्याच धर्तीवर मुख्य सचिव यांच्या कामाचे बदलते स्वरूप विचारात घेता, त्यांच्या निवासस्थानी देखील फर्निचर, गॅस, वीज व पाणी या सुविधा विनामुल्य स्वरुपात पुरविण्यात याव्यात. याबाबतचे प्रदान सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन-२४/२६ मार्फत संबंधितांना करण्यात यावे.

६. उपरोक्त परिच्छेद १ ते ३ नुसार ठोक भरपाईची प्रतिपूर्ती संबंधित अधिका-यांचे वेतन ज्या विभागातून काढण्यात येत असेल, त्या विभागाने, त्याबाबतचे देयक कोषागारात सादर करून दरमहा करण्यात यावी.

७. एका कॅलेंडर महिन्यापेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी, पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी, प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी, निलंबन या कारणासाठीच्या कालावधीमध्ये सदर ठोक भरपाई अनुज्ञेय करण्यात येऊ नये व त्याकरीता या शासन निर्णयासोबत 'परिशिष्ट-अ' प्रमाणे विहीत केलेले प्रमाणपत्र प्रत्येक देयकासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-३८१/२०१९/विनियम, दिनांक २८.०८.२०१९ आणि अनौपचारीक संदर्भ क्रमांक-३६९/१९/सेवा-३, दिनांक २८.०८.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

९. हे आदेश माहे ऑगस्ट-२०१९ पासून (ऑगस्ट २०१९ चे सप्टेंबर २०१९ मध्ये देय होणारे वेतन) अंमलात येतील.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२८१३५३४४५३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.08.28 17:10:41 +05'30'

(सीताराम कुंटे)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
६. सर्व मा.संसद सदस्य, विधानमंळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०.प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१५.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,
१६.राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१७.सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

१८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१९.महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
२०.महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
२१.महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२३.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई-४०००३२,
२४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२६.मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
२७.सर्व विभागीय आयुक्त,
२८. सर्व जिल्हाधिकारी,
२९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३१.वित्त विभाग / सेवा-३, विनियम, मंत्रालय, मुंबई,
३२.गृह विभाग / पोल-१, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
३३.महसूल व वन विभाग/फ-७, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
३४.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, मुंबई,
३५.प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
३६.महाराष्ट्र राज्य संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी,
३७.महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व सांविधीनिक व सार्वजनिक उपक्रम,
३८. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण, प्रशासकीय सुधारणा व लोकतक्रारी आणि पेन्शन मंत्रालय, नवी दिल्ली,
३९.सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
४०.अवर सचिव, कार्यासन -२४/२६, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
४१.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
४२.निवड नस्ती.

परिशिष्ट "अ"

मंत्रालयीन विभागातील सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव व मुख्य सचिव यांना मिळणा-या "ठोक भरपाईची" मागणी व त्याबाबतचे प्रमाणपत्र

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:भाप्रसे १०१३/प्र.क्र.३१/२०१३/का-९, दिनांक २८.८.२०१९ नुसार खालील कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या ठोक भरपाईची रक्कम मला देण्यात यावी.

कालावधी	एकूण महिने
दिनांक - - - - - -ते दिनांक - - --- - -	- - -- महिने

मी प्रमाणित करतो की, अनुज्ञेय नसलेला एका कॅलेंडर महिन्यापेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी, पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी, प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी, निलंबन किंवा इतर कालावधी वरील कालावधीत समाविष्ट नाही.

अधिका-याची स्वाक्षरी /-

दिनांक:

नाव :

पदनाम:

विभाग:

प्रमाणित करण्यात येणा-या सक्षम अधिका-याची स्वाक्षरी:

नाव व पदनाम
कार्यालयीन शिक्का